**प्रेसनोट** **दिनांक २७/०३/२०१९**

## मार्केटयार्ड पोलीस स्टेशन पुणे शहर

## वाढत्या उन्हाळयात सामान्य नागरिकांची तहान भागविण्यासाठी थंडगार पाणपोई चालु केले बाबत.

थंडीनंतर असह्यरित्या वाढलेल्या तापमानामध्ये सामान्य नागरिकांना मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे हद्दीत थंडगार पाणी उपलब्ध व्हावे यासाठी मार्केटयार्ड पोलीस स्टेशनच्या हद्दीत ठिकठिकाणी पाणपोई करण्याचे नियोजन असुन त्या दृष्टीकोनातुन आज दि.२६/३/२०१९ रोजी दुपारी १५/०० वा.आशिया खंडातील सर्वात मोठी धान्य बाजारपेठ असलेल्या मार्केटयार्ड मध्ये लेन नं ४ मधील संचेती ट्रेडर्स ह्या दुकानाबाहेर थंडगार पाण्याची पाणपोई मा.सहाय्यक पोलीस आयुक्त सो श्री मोरे यांच्या शुभहस्ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संभाजी एस.निंबाळकर यांच्या उपस्थितीत उद्घाटन करुन सामान्य नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे.

या कार्यक्रमासाठी मार्केटयार्ड धान्य बाजार परिसरातील नामवंत व्यापारी श्री अजय संचेती व संचेती परिवार,लोकमत वर्तमान पत्राचे पत्रकार श्री डुंगुरवाल,हमाल पंचायतचे कार्यकर्ते व एकुण ५० ते ६० लोकांचा जनसमुदाय हजर होता.अशा प्रकारे मार्केटयार्ड पोलीस स्टेशनच्या हद्दीत वेगवेगळ्या ठिकाणी पाणपोई बसविण्यात येणार आहेत.